# शिक्षण उपसंचालक कार्यालय पुणे विभाग, पुणे

## ११ वी ऑनलाईन प्रवेश सन २०१५-१६

**शैक्षणिक वर्ष २०१५-१६ मध्ये ११ वी प्रवेश गतवर्षीप्रमाणे ऑनलाईन पध्दतीने होणार आहेत, हे आपणास ज्ञात आहेच. या बाबत विदयार्थी व पालक यांच्यात जाणीव-जागृती करण्यासाठी खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.**

## सर्वसामान्य सूचना

१. इ. ११ वी ऑनलाईन प्रवेशामध्ये पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्र व कटक मंडळातील सर्व कनिष्ठ महाविद्यालयांचा समावेश करण्यात आलेला आहे.

२. किमान कौशल्यावर आधारित व्यवसायिक अभ्यासक्रम (M.C.V.C). होमसायन्स, उर्दू, तेलगू , गुजराथी, हिंदी, माध्यमाचे तसेच तांत्रिक कनिष्ठ महाविदयालयातील व रात्र शाळा कनिष्ठ महाविदयातील प्रवेश ऑनलाईन न होता संबंधित कनिष्ठ महाविदयालयाच्या स्तरावरुन होतील. **(Off line)**

३. इ. ११ वी ऑनलाईन प्रवेश नियंत्रण व नियोजनासाठी पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्राचे एकुण नऊ झोन तयार करण्यात आलेले आहेत. त्यानुसार झोनच्या परिसरातील कनिष्ठ महाविद्यालयांचा समावेश करण्यात आलेला असून ठराविक क्षेत्र निश्चित केलेले आहेत. शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांनी आपले कनिष्ठ महाविद्यालय कोणत्या झोन मध्ये आहे हे पाहून योग्य झोनमध्ये असल्याची खात्री करुन घ्यावी. ते झोन पुढील प्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| **१. .पुणे शहर विभाग** | **२. कोथरुड कर्वेनगर** | **३. स्वारगेट पर्वती धनकवडी** |
| **४. सिंहगडरोड** | **५. कॅम्प येरवडा** | **६. हडपसर** |
| **७. शिवाजीनगर औंध पाषाण** | **८. पिंपरी भोसरी** | **९. चिंचवड निगडी** |

४. ऑनलाईन प्रवेश पध्दतीत माध्यमिक शाळांचा सहभाग घेण्यात आलेला आहे. संबंधित माध्यमिक शाळा प्रवेश संबंधीची माहिती पुस्तिका (प्रवेश अर्जासह) खालील अनु.क्रं. ५ मधील अ ब क या माध्यमिक शाळेतून घेतील व आपल्या शाळेतून ऑनलाईन प्रवेश अर्ज **(http://pune.fyjc.org.in)** या वेबसाईटवर भरतील किंवा ज्या विद्यार्थ्यांकडे इंटरनेट सुविधा असेल असे विद्यार्थी स्वतःच्या घरी बसून प्रवेश अर्ज भरु शकतील.

५. प्रत्येक माध्यमिक शाळांनी आपल्या इ. १० वी तील विद्यार्थी संख्येएवढी माहिती पुस्तिका आपल्या निश्चित केलेल्या केंद्रावरुन रोख रक्कम भरणा करुन घेवून जावयाच्या आहेत. त्यापूर्वी दिनांक ९/४/२०१५ पर्यंत आपल्या शाळेतीलइ. १० वी परिक्षा प्रविष्ठ विद्यार्थी संख्यानुसार आवश्यक असलेल्या माहिती पुस्तीकांची लेखी मागणी आपल्या विभागनिहाय खालील केंद्रामार्फत नोंदवायची आहेत.

**अ) अहिल्यादेवी हायस्कूल (मुलींचे) ३१३, शनीवार पेठ, पुणे ३०**
**ब) डॉ. आंबेडकर मेमो. टेक्नि. हायस्कूल, सोलापूर बाजार, पुलगेटजवळ, पुणे ४०**
**क) श्रीमती गोदावरी हिंदी विदयालय, चिंचवड, पुणे १९**

६. इ. ११ वी ऑनलाईन प्रवेश अर्ज भरण्यासाठी आपल्या विद्यालयातील एक तांत्रिक कर्मचारी/ शिक्षक यांची नियुक्ती करावयाची आहे. व सदर कर्मचा-याने विद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांचे प्रवेश अर्ज दिलेल्या सूचनां प्रमाणे भरावयाचे आहेत. यासंदर्भात काही अडचण किंवा शंका निर्माण झाल्यास आपल्या विभागाचा झोन प्रमुख किंवा पर्यवेक्षिय अधिकारी यांच्याशी तात्काळ संपर्क करुन समाधान करुन घ्यावयाचे आहे.

७. इ. ११ वी ऑनलाईन प्रवेशाबाबत माहिती पुस्तिका रुपये १००/- किंमतीस उपलब्ध राहतील. सदर माहिती पुस्तिकेसह Login Id व Password दिला जाईल विदयार्थ्यांनी तो कायमस्वरुपी जपून ठेवायचा आहे. ज्या माध्यमिक शाळेमधून विद्यार्थ्यांचा प्रवेश अर्ज भाग १ व भाग २ पूर्ण भरण्यात येईल अशा विद्यार्थ्यांच्या संदर्भात रुपये २०/- शाळास्तरावर देण्यात येतील. प्रवेश अर्ज भरल्याच्या सकृतदर्शनी पुराव्यानुसार रुपये २०/- प्रतिविद्यार्थी माध्यमिक शाळेकडे ठेवून उर्वरीत रक्कम प्रवेश समितीच्या बँक ऑफ महाराष्ट्राच्या ६०१६५३०६१८२ या खाते क्रमांकावर जमा करावयाची आहे.

८. महाराष्ट्र राज्य मंडळाच्या विद्यार्थ्यांखेरीज अन्य मंडळाच्या विद्यार्थ्यांसाठी माहिती पुस्तिका (प्रवेश अर्ज) देण्याची व प्रवेश अर्ज आरक्षण तपासून अप्रूव्ह करण्याची व्यवस्था स्वतंत्र केंद्रावर करण्यात येईल.

९. पूर्ण फॉर्म भरण्यासंबधीच्या सर्व सूचना शाळास्तरावर व शिक्षण उपसंचालक कार्यालयाने नेमून दिलेल्या केंद्रावरच दिल्या जातील. या व्यतिरिक्त कोणत्याही खाजगी क्लास किंवा खाजगी केंद्रावरुन दिलेल्या सूचना वा प्रशिक्षण वैध धरले जाणार नाही. याची जाणीव पालकांना व विदयार्थ्यांना करुन दयावी.

९. विशेष आरक्षण लागू असलेल्या विदयार्थ्यांनी खालील तक्त्यात दिल्याप्रमाणे संबंधीत सक्षम अधिका-याकडून प्रमाणपत्र उपलब्ध करुन घ्यावे.

| अ.क्र. | विशेष आरक्षण | प्रमाणपत्र देणा-या अधिका-याचे नाव |
|---|---|---|
| १ | खेळाडू | जिल्हा क्रीडा अधिकारी |
| २ | कला व सांस्कृतिक | कला व सांस्कृतिक संचालनालय, मुंबई |
| ३ | अपंग | जिल्हा शल्य चिकित्सक |
| ४ | स्वातंत्र्य सैनिक | जिल्हाधिकारी |
| ५ | माजी सैनिक | जिल्हा सैनिक अधिकारी |
| ६ | आजी सैनिक | संबंधित विभागाचे प्रमुख |

१०. फॉर्म भरताना विद्यार्थ्यांनी खालीलप्रमाणे कागदपत्रे तयार ठेवणे आवश्यक आहे.

| खुला वर्ग | सामाजिक आरक्षण (SC/ST/VJA/NTB/NTC/NTD/OBC/SBC) | विशेष आरक्षण अपंग/क्रीडा/कला/ स्वातंत्र्य सैनिक/आजी-माजी सैनिक/बदली होऊन आलेले पालक |
|---|---|---|
| * गुणपत्रिका<br>* शाळा सोडल्याचा दाखला | * गुणपत्रिका<br>* शाळा सोडल्याचा दाखला<br>* उपरोक्त प्रमाणे आवश्यक प्रमाणपत्र | * गुणपत्रिका<br>* शाळा सोडल्याचा दाखला<br>* गुणपत्रिका<br>* उपरोक्त प्रमाणे आवश्यक प्रमाणपत्र |

११. प्रत्येक शाळेला एक स्वतंत्र Login Id व Password दिला जाईल. त्यानुसार मुख्याध्यापकांनी विद्यार्थ्यांचे ऑनलाईन प्रवेश अर्ज अप्रूव्हल करावयाचे आहेत. ज्या विद्यार्थ्यांना सामाजिक व विशेष आरक्षणाचा लाभ घ्यावयाचा आहे अशा विद्यार्थ्यांचा पार्ट १ पूर्ण करण्यासाठी मुख्याध्यापकांनी सामाजिक व विशेष आरक्षणाची प्रमाणपत्रे तपासून विद्यार्थ्यांचा प्रवेश अर्ज ऑनलाईन अप्रूव्ह करावयाचा आहे त्यानंतरच पार्ट २ विद्यार्थ्यांना ओपन होईल. त्यानंतर विद्यार्थ्यांनी पार्ट २ भरावयाचा आहे. (वेब साईट **(http://pune.fyjc.org.in)**)

१२. इ. ११ वी ऑनलाईन प्रवेशा संदर्भात या कार्यालयाची (Website) संकेतस्थळ (www.dydepune.com) आहे. या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आलेली सर्व परिपत्रके पहावीत या वेबसाईटवर आपणास वेळोवेळी सहविचार सभा, प्रशिक्षण वर्ग तथाआवश्यक त्या सूचना देण्यात येणार असल्याने सर्वांनी सदर वेबसाईट रोजच्या रोज काळजीपूर्वक पहावी.

वरील सूचनांचे काटेकारपणे पालन करणे अत्यंत आवश्यक आहे. सदरचे प्रसिध्दीपत्रक या कार्यालयाच्या संकेतस्थळ **www.dydepune.com** वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आले आहे.

(दिनकर टेमकर)
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे -१ तथा
अध्यक्ष
इ. ११ वी केंद्रीय प्रवेश समिती, पुणे